महाराष्ट्रातील जनतेचा आक्रोश, दैनिक नांदगांव

# आवाज

संपादक : भगवान सोनवणे

WWW.DAILYAWAZ.COM

आपला व्यवसाय वृद्धिंगत होण्यासाठी दैनिक आवाजमध्ये जाहिरात करण्याची सुवर्णसंधी!

एक महिना – २४९९/– रु.

तीन महिने – ५९९९/– रु.

सहा महिने – ९९९९/– रु.

✻ संपादक ✻

मो. क्र. ९५४५९१०१७७/८९९९९२१९९४

RNI Reg. No.: MAHMAR/2014/66104 ■ वर्ष – ११ वे ■ अंक क्र. – २९४ ■ मंगळवार दि.१७ जून २०२५ ■ किंमत – १ रूपया ■ पाने – ४

# मुंबईत मुसळधार पावसामुळे रेल्वे-मेट्रो सेवा ठप्प, ऑरेंज अलर्ट जारी

**दै. आवाज वृत्तसेवा...**

मुंबई – १६ जून २०२५ रोजी मुंबई आणि आसपासच्या भागात मुसळधार पावसाने जनजीवन विस्कळीत केले. सकाळी ८ वाजेपर्यंत शहरात सरासरी ९५ मिमी पाऊस पडला, ज्यामुळे सखल भागात पाणी साचले आणि वाहतूक विस्कळीत झाली. महापालिका अधिकाऱ्यांच्या मते, या काळात १८ जणांचा मृत्यू झाला आणि ६५ जण जखमी झाले.

भारतीय हवामान खात्याने पुढील २४ तासांत शहर आणि उपनगरांमध्ये मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. या पार्श्वभूमीवर, रायगडसाठी 'रेड' अलर्ट आणि मुंबई, ठाणे आणि पालघरसाठी 'रेड' अलर्ट जारी करण्यात आला आहे. मंगळवारी भरतीची शक्यता देखील आहे.

स्थानिक प्रशासनाने सुरक्षित राहण्याचे आवाहन केले आहे. हवामानामुळे मध्य आणि पश्चिम रेल्वेच्या उपनगरीय सेवांवर परिणाम झाला. सकाळच्या गर्दीच्या वेळी २० ते ३० मिनिटे उशिर झाल्याची तक्रार अनेक प्रवाशांनी केली. याशिवाय, घाटकोपर-अंधेरी-वर्सोवा मेट्रो मार्गावरील प्लास्टिकच्या चादरी ओव्हरहेड वायरवर पडल्यामुळे काही काळ सेवा विस्कळीत झाली होती. तथापि, नंतर सेवा सामान्य झाल्या. स्थानिक प्रशासनाने नागरिकांना सुरक्षित राहण्याचे आणि आवश्यकतेनुसार प्रवास करण्याचे आवाहन केले आहे.

इंडिगो आणि स्पाइसजेट सारख्या विमान कंपन्यांनी हवामानाच्या परिस्थितीमुळे प्रवाशांना विमानाची स्थिती तपासण्याचा सल्ला दिला आहे.

# कांदा उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी

## जिल्हा काँग्रेसतर्फे प्रांत कार्यालयास निवेदन सादर

**दै. आवाज वृत्तसेवा...**

शरद लोहकरे, लासलगाव – नाशिक जिल्ह्यामध्ये झालेल्या अवकाळी आणि पूर्वमोसमी पावसामुळे जिल्ह्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले.

मोठ्या प्रमाणात पडलेला अवकाळी पाऊस, वादळ वारा, गारपीट यामुळे अनेकांचा काढणीला आलेला कांदा शेतातच सडला, अनेक शेतकऱ्यांचे कांदे काढणीनंतर पूर्णपणे ओले झाले, बाजारभाव देखील कोसळले. त्याबरोबरच काही शेतकऱ्यांच्या कांदाचाळीचे देखील नुकसान झाले. या परिस्थितीमध्ये सरकारने शेतकऱ्यांना रोख स्वरूपात मदत



करण्याची मागणी घेऊन निफाड उपविभागीय दंडाधिकारी यांना नाशिक जिल्हा काँग्रेस कमिटी पदाधिकाऱ्यांनी निवेदन दिले यांप्रसंगी जिल्हा सरचिटणीस सचिन होळकर, दिगंबर गीते, प्रकाश अडसरे, मधुकर शेलार, राजेंद्र मोगल, महेश शिरसाट, नरेंद्र गीते, बालमभाई करंजीवाले, राजेंद्र होळकर आदी पदाधिकारी उपस्थित होते. सदर निवेदन हे वरिष्ठ पातळीवर पाठवून शेतकऱ्यांचे पंचनामे करून त्यांना मदत देण्याचा प्रयत्न केला जाईल असे उपविभागीय दंडाधिकारी शशिकांत मंगरुळे यांनी पदाधिकाऱ्यांना सांगितले. कांदा पीक हे नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे प्रमुख पीक असून शेतकऱ्यांना चांगले उत्पन्न देणारे पीक आहे, दिवसेंदिवस कांदा पिकाचा उत्पादन खर्च देखील वाढत आहे त्यातच या स्वरूपाच्या नुकसानीमुळे कांदा उत्पादक देशोधडीला लागत आहे. कांदा उत्पादक शेतकऱ्यांना तात्काळ मदतीची गरज आहे सरकारने मदत न केल्यास काँग्रेस पक्ष रस्त्यावर उतरून आंदोलन करेल असा इशारा काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस कृषीतज्ज्ञ सचिन होळकर यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

# येवल्यात सलग तीन दिवस मुसळधार पाऊस..!

## अवकाळीच्या भरवशावर केलेली पेरणी तरली, उर्वरित पेरण्यांनी घेतला वेग

**दै. आवाज वृत्तसेवा...**

लक्ष्मण घुगे राजापूर प्रतिनिधी:

यंदा मे मध्येच अवकाळी धोधो बरसला. त्यामुळे जून मध्ये तो ओढ देईल, अशी शक्यता वाटत असतानाच मृग नक्षत्रातही पाऊस धुवांधार कोसळतोच आहे. त्यात बुधवार, गुरुवारी व शुक्रवारी रात्री तर शनिवारी दुपारी तालुक्यात झालेल्या जोरदार पावसाने खरिपाच्या आशा पल्लवित केल्या आहेत. शुक्रवारी तालुक्यात सरासरी ४२ मिमी पाऊस पडला तर आतापर्यंत जूनचा एकूण १०० मिमी पाऊस नोंदला गेला आहे. काही शेतकऱ्यांनी अवकाळी पावसावरच पेरण्या केल्याने त्या पेरण्या ठरल्या आहेत. तीन दिवसात तब्बल ७० मिमी पाऊस झाल्याने केलेली पेरणी तरली आहे, तर बाकी असलेल्या पेरण्यांनीही वेग घेतल्याचे चित्र तालुक्यात दिसत आहे. मान्सूनपूर्व पाऊस कधी पडतच नाही. पण मान्सूनही वेळेत न आल्यास तालुक्यातील खरिपाचे चित्र नेहमीच गुंतागुंतीचे होते. किंबहुना जुलैतही पेरण्या करण्याची वेळ शेतकऱ्यांवर येते.

मान्सून वेळेत आला आणि पेरण्या जूनच्या दुसऱ्या आठवड्यातच उरकल्या असे कमी वेळेत घडते. यावर्षी मात्र मेमध्ये मुसळधार बेमोसमी पाऊस कोसळला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना आठवडाभर अगोदर शेतीची मशागत करणे सोपे झाले. त्यानंतर जून सुरू होताच हलका पाऊस काही भागात झाला. या पावसाच्या भरवशावर शेतकऱ्यांनी मका लागवड केली होती. मात्र तब्बल आठवडाभर पाऊस बेपत्ता झाल्याने शेतकऱ्यांचे तोंडचे पाणी पळाले होते. तसेच ज्यांची पेरणी बाकी राहिली होती ते शेतकरीही पावसाची चातकासारखी वाट पाहत होते. बुधवारी, गुरुवारी, शुक्रवार, अन शनिवारी ही संध्याकाळी मान्सून धो धो पाऊस कोसळल्याने चारच दिवसात चित्र बदलले आहे. यामुळे शेतकरी सुखावला असून मे जूनच्या पहिल्याच आठवड्यात झालेली खरिपाची पेरणी मार्गी लागली आहे. किंबहुना मकाचे कोंब जमिनीतून उगवले आहेत. तर पेरणी बाकी असलेल्या भागात या दोन दिवसाच्या पावसामुळे पेरण्यांना वेग आल्याचे दिसते. काही भागात जमिनीत पाणी साचून असल्याने पेरण्यांना वाव नसल्याने उघडीपीची आशा आहे. दरम्यान, तालुक्यात काही भागात जोरदार तर काही भागात अद्यापही कमी पाऊस पडल्याचे आकडेवारी सांगते.




श्री संत सेवालाल महाराज सेवाभावी संस्था, संचलित

**श्री पिनाकेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय**

(पुणे विद्यापीठ संलग्न)

वसंतनगर, पो. जातेगाव, ता. नांदगाव, जि. नाशिक–४२३१०६

✻ शैक्षणिक वर्ष २०२५–२६ पासून

**B.A./B.Com/B.Sc साठी प्रवेश देणे सुरू आहे.**

प्रवेश पात्रता – १२ वी पास (आर्टस्, कॉमर्स, सायन्स)




✻ वैशिष्टे ✻

- ✻ उच्च शिक्षित प्राध्यापक वर्ग
- ✻ भव्य प्रशासकीय व महाविद्यालय इमारत
- ✻ सि.सि.टि.व्ही. कॅम्पस
- ✻ ग्रथालय व वाचनालय स्वतंत्र इमारत
- ✻ मुला–मुलींसाठी स्वतंत्र वसतीगृह सुविधा
- ✻ भव्य सेमिनार हॉल व खेळाचे मैदान
- ✻ मर्यादित विद्यार्थी संख्या

प्रवेशासाठी संपर्क :- ९९२२१७२७९९

पत्ता – कै. गंगाराम धनसिंग राठोड शैक्षणिक संकुल, महादेव रोड, वसंत नगर, पो.जातेगाव, ता. नांदगाव, जि. नाशिक.

✻ प्राचार्य :- मोबा. 9922172799

श्री संत सेवालाल महाराज सेवाभावी संस्था, संचलित

**श्री पिनाकेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय**

(पुणे विद्यापीठ संलग्न)

वसंतनगर, पो. जातेगाव, ता. नांदगाव, जि. नाशिक–४२३१०६

प्रथम वर्ष पदवी अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया

(राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०) शैक्षणिक वर्ष २०२५–२६

**पदवी अभ्यासक्रम**

| | | |
|---|---|---|
| B.A.<br>(Bachelor of Arts Specialization)<br>B.A. Eniglish<br>B.A. Marathi<br>B.A. Hindi<br>B.A. History<br>B.A. Geography<br>B.A. Economice<br>B.A. Politics | B.Sc.<br>(Bachelor of Science Specialization)<br>B.Sc. Chemistry<br>B.Sc. Physics<br>B.Sc. Micro Biology<br>B.Sc. Botany<br>B.Sc. Zoology | B.Com.<br>(Bachlor of Com-merce)<br>Business Administration<br>Marketing |

**प्रवेशासाठी खालील प्रमाणे कागदपत्रांची पुर्तता करणे आवश्यक असेल**

१) ॲडमिशन फॉर्म
२) मुळ कागदपत्र (Orignal L.C.) व दोन स्वयंसाक्षांकित प्रती
३) गुणपत्रकाच्या दोन स्वयंसाक्षांकित प्रती
४) जातीचा दाखला व दोन स्वंयसाक्षांकित प्रती (आवश्यक असल्यास)
५) आधार कार्ड दोन स्वयंसाक्षांकित प्रती
६) शिक्षणात खंड असेल तर गॅप सर्टिफिकेट आपल्याकडे स्कॅन स्वरूपात ठेवावा.

टिपः महाविद्यालय सोडल्याचा मूळ दाखला सर्टिफिकेट आपल्याकडे स्कॅन स्वरूपात ठेवावा. सदर कागदपत्र शिष्यवृत्ती फॉर्म भरण्यासाठी आवश्यक आहे.

✻ अधिक माहितीसाठी संपर्क ✻

✻ प्राचार्य :– मोबा. 9922172799



# खिर्डीसाठे सरपंचपदी सौ. छाया राजेंद्र नागरे यांची निवड

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**खिर्डी साठे :–** येवला तालुक्यातील खिर्डीसाठे ग्रामपंचायत सरपंचपदी सौ छाया राजेंद्र नागरे व उपसरपंच संतोष मुरलीधर मोरे यांची बिनविरोध निवड करण्यात आली यासाठी अनुमोदक म्हणुन सचिन दावल साबळे यांनी तर सूचक म्हणुन संतोष मुर–लीधर मोरे यांनी सही केली. याप्रसंगी ग्रामपंचायत सदस्स सोन्याबाई शांताराम नागरे, लंकाबाई शिवाजी मुंडे, वर्षा वाल्मीक नागरे, हिराबाई मोरे, संदीप संजय नागरे, सुरेश गोविंदा शिंदे, उपस्थितीत होते. याप्रसंगी निवडणूक अधिकारी सौ. पूजा आठवले, तलाठी निकम मॅडम. ग्रामविकास अधिकारी



गायके भाऊसाहेब, ग्रामपंचायत कर्मचारी संदीप अरुण नागरे, श्रीराम कांगणे, दावल साबळे ,नंदू बिन्नर, शिवाजी लक्ष्मण मुंडे ,अमोल दादा मुंडे, महेश वाल्मीक चकोर .संपत कांगणे, योगेश इप्पर, बबन नागरे, संदीप सुभाष नागरे, तानाजी नागरे तुळशीराम नागरे, प्रल्हाद नागरे, प्रमोद सानप ,आनंदा साबळे, सुकलाल शिंदे, विजय लक्ष्मण मुंडे, संदीप सुभाष नागरे ,दिनेश ईश्वर नागरे, मनोज ना–गरे, पप्पू साबळे ,रघु मोरे ,अनिल मुंडे, अतुल रावसाहेब नागरे, दीपक नागरे, मच्छिंद्र कांगणे, संतोष कांगणे, राजेंद्र नागरे ,सोपान नागरे, कैलास साबळे आदी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.

# सुरगाणा तालुक्यात शाळा प्रवेशोत्सव उत्साहात बैलगाडीतून नवोगत विद्यार्थ्यांची मिरवणूक

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**लक्ष्मण पवार, हतगड –**

सुरगाणा तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या ३१६ शाळांसह शासकीय,खाजगी अनुदानित आश्रम शाळांमध्ये नवोगत विद्यार्थ्यांच्या प्रवेशोत्सव उत्साहात साजरा झाल्याची माहिती तालुका गटशिक्षणाधिकारी अल्पा देशमुख यांनी दिली. दीड ते दोन महिन्यांनंतर

शाळेचा पहिला दिवस असल्याने मा.शिक्षणमंत्री महोदय यांच्या सुचने नुसार प्रत्येक शाळेवर क्षेत्रीय यंत्रणेमार्फत भेटी देण्यात आल्या. या प्रवेशोत्सवाची जय्यत तयारी शालेय व्यवस्थापन समितीने केली होती.

आलेल्या अतिथी मार्फत विद्यार्थ्यांना शालेय पाठ्यपुस्तके,गणवेश, मिष्टान्न भोजन वाटप करण्यात आले.शालेय परिसरात स्वच्छता, टापटीप, रांगोळी, पताका, तोरण, तिरंगी फुगे, पाना फुले, हारांनी सजविण्यात आला होता.

विद्यार्थ्यांचा शाळा प्रवेश आनंदी व उत्साही वातावरणात झाला. शाळ–ेत प्रवेश दिंडी पावरीचा ठेका, नृत्य, प्रभात फेरी काढण्यात आली. नव–ोगत प्रवेश विद्यार्थ्यांचे 'शाळेतील





पहिले पाऊल ठसा' घेण्यात आले.गत शैक्षणिक वर्षात राज्याचे शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी जिल्हा परिषद शाळा बोर–गाव येथे भेट देऊन शैक्षणिक कामकाज पाहिले होते याच शाळेत कळवण सुरग–ाणा विधानसभेचे आमदार नितीन पवार, गटशिक्षणाधिकारी अल्पा देशमुख यांनी प्रवेशोत्सवाला हजेरी लावत विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. शाळेला भौतिक सुविधा उपलब्ध करीता दहा लाख रुपये देणार असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांची पावरीच्या ठेक्यावर आदिवासी नृत्य सादर करीत सजविलेल्या बैलगातून मिरवणूक काढण्यात आली यामध्ये बोर–गावचे सरपंच अशोक गवळी,शिंदे दिगरचे सरपंच पुंडलिक पवार, सराडचे सरपंच नामदेव भोये, नागशेवडीचे माजी सरपंच एकनाथ महाले,शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष भास्कर भोये, ग्रामपंचायत सदस्य रमेश पवार, हिराबाई गांगुर्डे, हिरामण हाडस, नामदेव भोये,काका गायकवाड, पुष्पा पालवी, सोनी भाले–राव, काशिनाथ गायकवाड,सुधाकर मोरे, गणेश गायकवाड, कैलास गवळी,शिक्षक लक्ष्मण भोये, ग्रामविकास अधिकारी सुखदेव बागुल,अंगणवाडी प्रवेशिका साबळे, कैलास गायकवाड पुंडलिक गावित, पोलीस पाटील काशीराम भोये, रामचंद्र भोये, गणेश अवसरकर, खंडू भोये, अंगणवाडी सेविका उपस्थित होत्या.

जिल्हा परिषद शाळा सुरगाणा नं. १ व २ मध्ये गावातून प्रभातफेरीचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांचे पशुवैद्यकीय अधिकारी सुरगाणा डॉ. नरेंद्र भागवत, नगरपंचायतीचे नगराध्यक्ष भरत वाघमारे यांनी गुलाब पुष्प देऊन स्व–ागत केले. मुख्याध्यापक सुरेश जाधव, रतन चौधरी, सुधाकर भोये, पुष्पा गाढवे, जयवंता ठाकरे, नाथ देशमुख, चित्रा चौरे आदी उपस्थित होते.

# सुसंस्काराचा पाया म्हणजे यशाचा उत्तम मार्ग – प्रा. डॉ.अभिजीत माळी

## म्हाकवेतील मंडलिक वाचनालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार




**दै. आवाज वृत्तसेवा...**

जे.के.गोरंबेकर/कागल – जिद्द,आणि ध्येयाने प्रेरित होऊन केलेल्या प्रामाणिक कष्टाने तुम्ही यशस्वी व्हाल. सुसंस्काराचा पाया म्हणजे यशाचा उत्तम मार्ग आहे. विद्यार्थ्यांनी एखाद्या परीक्षेत अपेक्षेप्रमाणे गुण मिळाले नाहीत म्हणून खचून जाऊ नये. पुन्हा जोमाने कष्ट करण्याचे मनोधैर्याने तुम्ही यश संपादन कराल. विद्यार्थ्यांनी आईवडीलांच्या कष्टाची जाणीव ठेवा. असे प्रतिपादन वारणानगर येथील इंजीनियरिंग कॉलेजचे प्राध्यापक डॉ.अभिजीत माळी यांनी केले.

म्हाकवे (ता.कागल) येथील कै. विजयमाला मंडलिक वाचनालयाच्यावतीने विविध क्षेत्रात यशस्वी झालेले विद्यार्थी व मान्यवरांच्या सत्कार समारंभ कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रवचनकार श्रीकांत पाटील होते. प्रमुख पाहुणे म्हणून स्वराज माझदाचे युनिट मॅनेजर दिलीप माळी होते. विविध क्षेत्रात यश संपादन केलेले कृष्णात पाटील, अभिजीत माळी, सायली पाटील, रोहन माळी, नंदन माळी, अथर्व पाटील, वृषाली डफळे, अंजली माळी यांचा सत्कार करण्यात आला.

स्वागत स्मिता पाटील यांनी तर प्रास्ताविक श्री.के.आर.पाटील यांनी केले. यावेळी श्रीकांत पाटील, सुनिल पाटील, दिलीप माळी, एस.के.पाटील, भिकाजी पोवार, सुरेखा माळी,भाग्यश्री माळी, अनिता पाटील, महादेव डाफळे यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमास रामचंद्र पाटील, प्रकाश पाटील, मनोज पाटील, सचिन पाटील, सतिश पाटील, दत्तात्रय पाटील, सागर पाटील उपस्थित होते. आभार रमेश पाटील यांनी मानले.

# जय बाबाजी परिवाराच्यावतीने तिरुपती बालाजी येथे १०८ कुंडात्मक महायज्ञ सोहळा !

**दै. आवाज वृत्तसेवा...**

ओझर : प्रतिनिधी – निष्काम कर्मयोगी जगद्गुरु जनार्दन स्वामी महाराज धर्म पिठाचे पिठाधीश्वर नंत विभूषित जगद्गुरु स्वामी शांतिगिरीजी (मौनगिरीजी) महाराज यांच्या प्रेरणेने व प्रमुख उपस्थितीत पुण्यभूमी श्रीक्षेत्र तिरुपती बालाजी येथे १५ ते २२ जुलै दरम्यान लक्षवेधी धर्म सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.या सोहळ्यात १०८ कुंडात्मक लक्ष्मी कुबेर महायज्ञ संपन्न होणार आहे.महाजपानुष्ठान,अखंड नंदादीप,श्रमदान यांसह भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन या सोहळ्यात करण्यात आले असल्याची माहिती जय बाबाजी भक्त परिवार व धर्म सोहळा नियोजन समितीच्या वतीने देण्यात आली.

अध्यात्मिक उन्नती ते राष्ट्र कल्याण अशी वाटचाल करणाऱ्या जय बाबाजी भक्त परिवाराच्या वतीने अनंत विभूषित जगद्गुरु स्वामी शांतिगिरीजी (मौनगिरीजी) महाराज यांच्या प्रे–रणेने व प्रमुख उपस्थितीत वर्षभर देव देश धर्मासाठी विविधांगी सोहळ्यांचे आयोजन केले जाते. प्रतिवर्षी तीर्थ यात्रेचेही आयोजन करण्यात येते.भक्त परिवाराच्या वतीने आजतागायत बद्रीनाथ,केदारनाथ,जगन्नाथपुरी, कामाख्या देवी,काशी,कुरुक्षेत्र यांसह देशातील जवळपास सर्वच प्रमुख ठिकाणी तीर्थयात्रा व त्यानिमित्ताने आठवडाभर जपानुष्ठान,महायज्ञ व श्रमदानाच्या माध्यमातून स्वच्छता मोहीम राबवली गेली आहे. याबरोबरच विविध कार्यक्रमांचे देखील आयोजन करण्यात येत असते. भक्त



परिवाराच्या वतीने यावर्षी वार्षिक तीर्थ यात्रा कार्यक्रमाअंतर्गत पुण्यभूमी श्रीक्षेत्र तिरुपती बालाजी येथे १५ ते २२ जुलै दरम्यान भव्य दिव्य स्वरूपात ओम जगद्गुरु जनशांती धर्म सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.या सोहळ्यात महाजपानुष्ठान,१०८ कुंडात्मक भव्य लक्ष्मी कुबेर महायज्ञ,अखंड नंदादीप, हस्त लिखित नामजप,श्रमदान,सत्संग,प्रवचन यांसह रोज ब्रह्म मुहूर्तावर पहाटे ५ वाजता नित्य नियम विधी,ध्यान,प्राणायाम,आरती,श्री सार्थ एकनाथी भागवत वाचन यांसह भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.येथे होणाऱ्या विविध उपक्रमात तसेच मुख्यतः महायज्ञ सोहळ्यात सहभागी होऊन आलेल्या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन धर्म सोहळा नियोजन समिती व जय बाबाजी भक्त परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

# आमदार आशुतोष काळे यांच्या कृपेने देवकर वस्तीला मिळाले नवीन रोहित्र

कोपरगाव प्रतिनिधी – जेऊर कुंभारी (ता. कोपरगाव) अनेक वर्षांपासून विजेच्या अडचणींना तोंड देणाऱ्या देवकर वस्तीतील शेतकऱ्यांची प्रतीक्षा अखेर संपली आहे. आमदार आशुतोष काळे यांनी शेतकऱ्यांना दिलेला शब्द पाळत सोळके वस्ती येथे नवीन रोहित्र (DP) बसवण्यात आले असून, त्यामुळे देवकर वस्तीवरील विजेचा ताण लक्षणीयरीत्या कमी होणार आहे.

देवकर वस्तीमध्ये एकाच रोहित्रावर अनेक मोटारी कार्यरत असल्यामुळे विजेचा भार सातत्याने वाढत होता. परिणामी, वारंवार रोहित्र जळणे, दुरुस्तीसाठी दहा–पंधरा दिवस वाया जाणे, अशा प्रकारच्या अडचणींमुळे शेतकरी त्रस्त होते. शेतीच्या हंगामात पिकांना पाणी देता न येणे, हेसुद्धा मोठं संकट ठरत होतं. या समस्येच्या समाधानासाठी गावकरी व आमदार आशुतोष काळे मित्र मंडळाचे कार्यकर्ते यांनी आमदार काळे यांची भेट घेतली होती. या मागणीची तात्काळ दखल घेत आमदार काळे यांनी नवीन रोहित्र लवकरच उप–लब्ध करून दिले जाईल, अशी हमी दिली होती. त्या आश्वासनाची पूर्तता करत, १५



जून रोजी सोळके वस्ती येथे नवीन डीपी बसवण्यात आली. या उपक्रमामुळे देवकर वस्तीतील विजेचा भार कमी होणार असून शेतकऱ्यांना अखंडित व सुरळीत वीजपुरवठा मिळण्यास मदत होणार आहे. या कामाबद्दल आमदार आशुतोष काळे मित्र मंडळाचे कार्यकर्ते, रामनाथ आव्हाड, केशव आबनावे पाटिलबा वक्ते, दिलीपराव शिंदे,बापुराव वक्ते, धोंडीराम वक्ते, महेंद्र वक्ते, भाऊसाहेब वक्ते, किरण वक्ते, विरू शिंदे,भानुदास वक्ते,राजेंद्र गिरमे,पोपट शिंदे, संजय चव्हाण, राजेंद्र चव्हाण यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी रामनाथ आव्हाड,पाटीलबा वक्ते, भानुदास वक्ते यांनी शेतकऱ्यांच्या वतीने आमदार आशुतोष काळे यांचे आभार मानले.

या कार्यक्रम प्रसंगिक आशोक राऊत, शामराव वक्ते, लक्ष्मण वक्ते, गोकुळ जावळे, बाळासाहेब देवकर, दादास–ाहेब चव्हाण,सतिश गोसावी, निराभाऊ जावळे, बाळासाहेब सोळके ,दौलत सोळके, गंगाराम सोळके ,पक्का वक्ते, सुनिल वक्ते, राजेंद्र वक्ते, संजय वक्ते, आप्पासाहेब सोळके, पोपट सोळके, किसन सोळके ,द्वारकानाथ देवकर, बारकु देवकर, दिपक गिरमे, रावसाहेब गोसावी, पाराजी वक्ते, साईराज मेहेत्रे, प्रसाद जगताप आदी उपस्थित होते. सुत्रसंचालन बाळासाहेब देवकर यांनी केले व आभार भानुदास वक्ते यांनी मानले.

हे पत्रक मालक, मुद्रक, संपादक, प्रकाशक, भगवान नामदेव सोनवणे यांनी शार्प ऑफसेट, मालेगांव बस स्टँड समोर, मालेगांव येथे छापून ढासे मळा, सावता नगर, नांदगांव ता.नांदगांव, जि.नाशिक येथे प्रकाशित केले. सहसंपादक भाऊसाहेब हुजबंद (८९९९९२१९९४). या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या, लेख, जाहिराती यामधून व्यक्त झालेल्या मतांशी मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक, सहसंपादक सहमत असतीलच असे नाही. मुद्रण दोष संभवनीय. (नांदगांव न्यायकक्षेत) सर्व अधिकार सुरक्षित. मो. ९५४५९१०१७७ – ९२७२४५३९२१ email : nandgaonawaz@gmail.com

# मेहुणबारे येथील नागरी वस्ती जवळच बिबट्या, बछड्यांचा वावर

**दै. आवाज वृत्तसेवा...**

यशवंतराव ताडगे चाळीसगाव/प्रतिनिधी:- चाळीसगाव तालुक्यातील मेहुणबारे येथे शनिवारी दुपारी उसाच्या शेतात मजूर काम करत असताना पाचटमध्ये बिबटचे दोन बछडे आढळून आल्याने एकच खळबळ उडाली आहे. या ठिकाणी मादीसह तीन बछडे असल्याचा अंदाज वर्तविण्यात येत आहे.
मेहुणबारे गावापासून १००मीटरच्या अंतरावर असलेल्या उसाच्या शेतात मजूर काम करीत असताना, त्यांना तीन बछडे आढळून आल्याने मजुरांनी तोबडतोब ही माहिती शेतमालकाला कळवली. त्यानंतर शेतमालकांनी वन विभागाच्या परिक्षेत्र अधिकारी शीतल नगराळे यांना कळविली. ही माहिती मिळताच वन विभागाच्या परिक्षेत्र अधिकारी शीतल नगराळे यांनी कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेतली.

मेहुणबारे गावापासून १००मीटर वर असलेल्या कैलास महाजन यांच्या मालकीच्या शेतात ऊस तोड मजूर करीत होते.ही ऊस तोड शेतकरी कैलास महाजन यांच्या मालकीच्या शेतात चालू असताना मजूरांची हालचाल जाणवल्याने, मादी



सावध होऊन तिने एक बछड्याला घेऊन निघून गेली. तर दोन बछडे तेथेच राहिले.

दरम्यान या घटनेची माहिती शेतकरी यांनी दिल्याने वन परिक्षेत्र अधिकारी शीतल नगराळे यांनी घटना स्थळी धाव घेतली. मादी व बछडे यांच्या हालचाली नजर ठेवण्यासाठी या ठिकाणी तीन ट्रॅप कॅमेरे बसविण्यात आले ,असून वन
विभाग त्याठिकाणी लक्ष ठेवून आहे.
मेहुणबारे येथील शेतकरी कैलास
महाजन यांच्या शेतात उसाचे बेणे तोड सुरू होती. तेव्हा दुपारी १२ वाजेच्या सुमारास उसतोड मजुरांनी उसाची तोडणी करून त्याच्या मोळ्या बांधल्या व ते चालले गेले. काही वेळानंतर हे मजुर या मोळ्या उचलण्यास गेले असता त्यांना उसाच्या पाचटमध्ये बिबट्याचे तीन बछडे आढळून आले. त्यांनी या घटनेची माहिती शेतमालकाला दिली.

शेतमालक महाजन यांनी तात्काळ चाळीसगाव वन विभागाला घटनेची माहिती दिल्यावर वनपरिक्षेत्र अधिकारी शीतल नगराळे यांच्यासह वनरक्षक ललीत पाटील, श्रीराम राजपूत, बाळू शितोळे, भटू अहिरे, उमेश सोनवणे, राहूल मांडोळे यांनी घटनास्थळी धाव घेतली.

# भारत मुक्ती मोर्चा व बहुजन मुक्ती पार्टी संयुक्त कोकणस्तरीय बैठक ठाणे येथे संपन्न

**दै. आवाज वृत्तसेवा...**

सुरेश जगताप/ठाणे. : प्रस्थापित व्यवस्थेने गेल्या पाच वर्षांपासून नगर परिषद, नगरपालिका, महानगर पालिका तसेच ग्रामपंचायत निवडणूक रखडून ठेवली होती परिणाम स्वरूप जनतेच्या अनेक समस्या निर्माण झाल्या असून सामान्य नागरिक त्रस्त झाले आहेत. आता कुठे निवडणूक आयोगाने निवडणूक जाहिर केली असून जनतेच्या सर्व समस्या सोडवण्यासाठी बहुजन मुक्ती पार्टीचे सर्व उमेदवार राज्यात उभे व्हावे असे मत भारत मुक्ती मोर्चाचे प्रदेश अध्यक्ष सचिन भाऊ बनसोडे यांनी भारत मुक्ती मोर्चा व बहुजन मुक्ती पार्टी कोकण स्तरीय संयुक्त बैठकीत व्यक्त केले आहे.

१४ जुन रोजी ठाणे येथे बामसेफ प्रणित भारत मुक्ती मोर्चा बहुजन मुक्ती पार्टी यांची संयुक्त कोकण स्तरीय चिंतन बैठक ठाणे येथे पार पडली त्यावेळी बहुजन मुक्ती पार्टी चे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष मा प्रताप दादा पाटिल यांनी प्रमुख मार्गदर्शन करताना पक्षाची भूमिका स्पष्ट केली व सर्वांना जोरदार तैयारी करण्यासाठी



आव्हान केले आहे.

दरम्यान गेल्या पाच वर्षांपासून निवडणूका रखडल्या होत्या त्यामुळे जनतेच्या अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत अनेक ग्रामीण भागातील रोड रस्ते असतील तसेच शालेय शिक्षण व रोजगाराच्या समस्या सोडवण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातून बहुजन मुक्ती पार्टी न्याय मिळवुन देण्यासाठी पुरेपूर्ण प्रयत्न करीन असे ठाम पने म्हणत सर्व कार्यकर्त्यांनी व उमेदवारांनी कंबर कसून खंबीर पने निवडणुकीच्या रिंगणात उभे रहावे असे आवाहन बहुजन मुक्ती पार्टीचे कार्यकारी अध्यक्ष मा निलेश दादा येलवे यांनी मुख्य मार्गदर्शक करताना सांगितले.

यावेळी रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, मुंबई सह ठाणे जिल्ह्यातील कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान निवडणुका लक्षात घेता कोकण स्तरीय कार्यकर्ते व उमेदवार सर्वत्र उभे करण्याचा एकमेव निर्णय घेण्यात आला व बीएमपीच्या सर्व कार्यक्रममध्ये तन मन धनाने सहकार्य करावे व पक्ष वाढवण्यासाठी जोमाने काम करावे असे आदेश सचिन भाऊ यांनी समस्त उपस्थितांना दिले आहेत.

बहुजन मुक्ती पार्टी च्या उमेद्वारांना निवडणूण आणण्यासाठी भारत मुक्ती मोर्चा व बहुजन मुक्ती पार्टी आंच संयुक्त दौरा महाराष्ट्रातील सर्व ६ विभागमध्ये केले जाणार असून दौऱ्या नंतर महाराष्ट्रामधील सर्व महान-गर पालिका नगरपालिका नागरपंचायत निवडणुकीसंधर्भात बैठक लावून उमेदवारांची यादि जाहिर केली जाणार आहे.

यावेळच्या निवडणुकीमध्ये बहुजन मुक्ती पार्टी चा झेंडा प्रत्येक महानगरपालिका व नगरपालिका आणि नगर पंचायतीमध्ये ला-गेल अशी सकारात्मक चर्चा जन सामान्यांमध्ये रंगली आहे व या बैठकीमुळे कोकण स्तरावरील सर्व कार्यकर्त्यांमध्ये ऊर्जा निर्माण झाली आहे व पुढे अजुन जोमाने काम करतील असे पदाधिकाऱ्यांनी अश्वसित केले..

# अझीम प्रेमजी फाउंडेशन कडून ‘हेल्थ इक्विटी फेलोशिप’ जाहीर

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नाशिक, : अझीम प्रेमजी फाउंडेशनने ‘अझीम प्रेमजी हेल्थ इक्विटी फेलोशिप’ जाहीर केली आहे. ही फेलोशिप १८ महिन्यांची असून, पदव्युत्तर डॉक्टरांसाठी एक सखोल आणि प्रत्यक्ष अनुभव देणारी शिकण्याची मोठी संधी आहे. ही फेलोशिप अझीम प्रेमजी फाउंडेशन आणि देशभरातील ११ प्रतिष्ठित आरोग्य संस्थांच्या संयुक्त प्रयत्नातून राबवली जात आहे. या कार्यक्रमाअंतर्गत फेलोशिपधारकांना ग्रामीण भागातील रुग्णांसोबत प्रत्यक्ष काम करण्याचा अनुभव मिळणार आहे. विविध रुग्णप्रकारांच्या हा-ताळणीचा सराव आणि वरिष्ठ डॉक्टरांकडून मार्गदर्शन यामुळे फेलोजना प्रभावी क्लिनिकल कौशल्ये आणि समुदायातील आरोग्यविषयक अनुभव मिळणार आहे. ही फेलोशिप स्वीकारल्यास फेलोजना आरोग्यसेवेच्या आघाडीच्या पातळीवर प्रत्यक्ष कामाचा मौल्यवान अनुभव मिळणार आहे. आरोग्य क्षेत्रा-तील विषमतेची कारणे आणि अडथळे समजून घेण्याची संधी या फेलोशिपमुळे मिळेल. अनुभवी तज्ज्ञ आणि स्थानिक समुदायासोबत मिळून परिणामकारक उपाययोजना राबवण्याची संधीही मिळू शकते.

## मंत्री छगन भुजबळ यांच्या सूचना

नाशिक : अवकाळी पावसामुळे घराचे पत्रे उडून जखमी झालेल्या शेतकरी कुटुंबियांना उपचारार्थ तातडीने वैद्यकीय मदत उपलब्ध करून द्यावी, अशा सूचना राज्याचे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी दिल्या. येवला तालुक्यातील गवंडगाव येथे अवकाळी पावसामुळे यांच्या घराचे पत्रे उडून झालेले नुकसानीची पाहणी तसेच यामुळे जखमी झालेल्या त्यांच्या कुटुंबियांची विचारपूस मंत्री भुजबळ यांनी केली.

# जिल्ह्यातील अस्थिव्यंग दिव्यांगांसाठी कृत्रिम अवयव वाटप शिबिरांचे आयोजन

**दै. आवाज वृत्तसेवा...**

चंदन खरे, नाशिक - जिल्ह्यातील अस्थिव्यंग आणि दिव्यांगांना खासगी संस्था आणि जिल्हा परिषदेच्या सहकार्यातून कृत्रिम अवयव उप-लब्ध होणार आहे. एलिम्को संचालित एस. आर. ट्रस्टच्या वतीने जिल्ह्यात एडिप योजनेंतर्गत १६ ते ३० जून या कालावधीत सर्व १५ तालुक्यात यासाठी शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हाभरात आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे. भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम (एलिम्को) यांच्या वत्तीने सदर दिव्यांग लाभार्थ्यांना मोफत कृत्रिम अवयव व सहाभुत साधने इत्यादीचे वाटप करण्यात येते..शिबिरात एलिम्कोचे तज्ज्ञ अस्थिव्यंग, दिव्यांगांना कृत्रिम हातपायांसाठी मोजमाप घेवून जा-गेवरच कॅलिपर्सचे वितरण करण्यात येणार आहे. दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय जिल्हा परिषद यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील गटविकास अधिकारी सह समन्वय म्हणुन जबाबदारी सोपविण्यात आली आहे. जिल्ह्यात आयोजित करण्यात येत असलेल्या या शिबिराचा अस्थिव्यंग असलेल्या दिव्यांगांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे. दरम्यान जिल्हाभरात आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरासाठी अस्थिव्यंग व्यक्तींनी आपले आधार कार्ड, रेशनकार्ड व वैद्यकीय प्रमाणपत्र (यूडीआयडी) यासह आपापल्या भागा-तील नियोजित प्रमाणपत्रासह ठिकाणी उपस्थित रा-हावे, असे आवाहन जिल्हा परिषदेकडून करण्यात आले आहे. दरम्यान, आज जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांच्या उप-स्थितीत नाशिक पंचायत समितीमध्ये या शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी ४२ अस्थिव्यग लाभार्थी यांना हात पाय व कॅलिपर्स बसवण्यात आले. यावेळी गटविकास अधिकारी श्रीमती सोनिया नाकोडे, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी भरत चौधरी व सुदाम पाळदे आदि यावेळी उपस्थित होते. शिबिरांचे वेळापत्रक याप्रमाणे- १७ जून- गटविकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय बागलाण, १८ जून- गटविकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय चांदवड, १९ जून- गटविकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय निफाड, २० जून- गटविकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय सिन्नर, २१ जून- गटविकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय इगतपुरी, २२ जून- गटविकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय दिंडोरी, २३ जून- गटविकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय पेठ २४ जून-गटविकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय सुरगाणा, २५ जून-गटविकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय देवळा, २६ जून-गटविकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय कळवण, २७ जून-गटविकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय येवला, २८ जून-गटविकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय मालेगाव २९ जून-गटविकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय नांदगाव, ३० जून-गटविकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय त्र्यंबकेश्वर.

# नांदगाव तालुका स्व.गंगाधर शिवराम आहेर शिक्षक पतसंस्थेच्या चेअरमन पदी परशराम धर्मा शेळके

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**यशवंतराव ताडगे पळाशी प्रतिनिधी :-** नांदगाव तालुका स्व.गंगाधर शिवराम आहेर शिक्षक पतसंस्थेच्या चेअरमन पदी मंगळणे येथील रहिवाशी परशराम धर्मा शेळके व व्हाईस चेअरमन पदी भाऊसाहेब मवाळ यांची बिनविरोध निवड झाली.

निवड निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून उगलमुगले यांनी कामकाज पाहिले. शिक्षक पतसंस्था कार्यालयात दिनांक १३जून शुक्रवार रोजी चेअरमन व व्हाइस चेअरमन पदाच्या निवडी संदर्भात संचालक मंडळाची विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती.



यावेळी शेवाळे, कांतीलाल जाधव, शरद पवार, पाठाडे, अनिल बोरसे, आर पी बोरसे, राजेंद्र पाटील, ठाकरे , श्रीमती धोंडगे मॅडम ,देसले मॅडम व पतसंस्थेचे लिपिक सागर शेवाळे व शिपाई पाटील उपस्थित होते.

स्वर्गीय शिक्षक नेते आण्णा-साहेब गंगाधर शिवराम आ-हेर प्राथमिक शिक्षक नांदगाव तालुका पतसंस्थेच्या चेअरमन पदाचा कांतीलाल जाधव व व्हा. चेअरमन पदाचा प्रविण ठाकरे यांनी नियोजित वेळेप्रमाणे रोटेशन पध्दतीने चेअरमन व व्हा. चेअरमन पदाचा राजीनामा दिला होता. रिक्त झालेल्या चेअरमन व व्हाइस चेअरमन पदाच्या निवडीसाठी विशेष बैठक बोलविण्यात आली. चेअरमन पदासाठी परसराम धर्मा शेळके यांची तर व्हाईस चेअरमन पदाकरिता भाऊसाहेब मावळ यांचा एकमेव अर्ज आल्याने,त्यांची एकमताने खेळीमेळीच्या वा-तावरणात बिनविरोध निवड झाली. निवड होताच फटक्यांची आतषबाजी करत आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी नवनिर्वाचित चेअरमन, व्हाइस चेअरमन यांचा सत्कार करण्यात आला.

## सोनुबाई मटाले यांचे निधन



**दै. आवाज वृत्तसेवा...**

नविन नाशिक : कामटवाडे गावं येथील सोनुबाई शंकर मटाले (९२) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले.त्याच्या पश्चात पाच मुले,दोन मुली, सुना, नातु, नातसुना,पतु असा परिवार आहे. कामटवाडे गावं येथील कै.शंकर बाळकृष्ण मटाले (पोलीस पाटील )यांच्या त्या पत्नी व प्रसिद्ध वकील मनोहर मटाले यांच्या त्या मातोश्री होत.

## कै.पुंडलिक पांडूरंग मवाळ विद्यालयात नवागतांचा प्रवेशोत्सव साजरा

**दै. आवाज वृत्तसेवा...**

पिंपरखेड - सोमवार दि. १६ जून २०२५ कै.पुंडलिक पांडूरंग मवाळ विद्यालयात आज नवागतांना पाहुण्यांच्या हस्ते गुलाबपुष्प देऊन प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला.

आज शैक्षणिक वर्षांचा पहिलाच दिवस, इयत्ता पाचवीला आज अनेक विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. अशा नवागत विद्यार्थ्यांचे शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अनिल बोरसे, मुख्याध्यापक काशिनाथ गवळी, पालक गोपाळ चव्हाण, भाऊसो. संदीप मवाळ, शिक्षक संजय कांदळकर, श्रीमती अलका शिंदे, कैलास पठाडे, लक्ष्मण जाधव, उत्तम सोनवणे, आबासाहेब सोनवणे आदींच्या हस्ते गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. तसेच ५वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना नवीन मोफत पाठय़पुस्तके वाटप करण्यात आले.

## राजापूरच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत नवागतांचे स्वागत



**दै. आवाज वृत्तसेवा...**

लक्ष्मण घुगे राजापूर प्रतिनिधी येवला तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा राजापूर ता येवला येथे इयत्ता पहिलीच्या नवगतांचे स्वागत शिक्षक आमदार किशोर दराडे यांचे प्रतिनिधी म्हणून येवला पंचायत समितीचे माजी सभापती डॉक्टर सुधीर जाधव हे उपस्थित होते. येवला पंचायत समिती शिक्षण विस्तार अधिकारी सौ ठोके मॅडम , शिक्षण विस्तार अधिकारी वाकचौरे मॅडम उपस्थित होते. विद्यार्थ्यांचे प्रभात फेरी काढून जनजागृती करण्यात आले त्यानंतर विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प देऊन नवगतांचे स्वागत करण्यात आले तसेच विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकाचे व गणवेश वाटपही करण्यात आले विद्यार्थ्यांचे पहिले पाऊल शासनाच्या उपक्रमांतर्गत मुलांचे पायाचे ठसे घेण्यात आले त्याचबरोबर विद्यार्थ्यांचे सेल्फी काढण्यात आले डॉ सुधीर जाधव यांनी याप्रसंगी बोलताना जिल्हा परिषद शाळेची गुणवत्ता व पट संख्या वाढत आहे त्याचप्रमाणे या वर्षी शासनाने सुरु केलेला CBSC अभ्यासक्रमाचा विद्यार्थांना नक्कीच फायदा होईल असे प्रतिपादन केले. तसेच लक्ष्मण घुगे यांनी आपल्या मनोगतात खरोखर जिल्हा परिषदेचे विद्यार्थी हे कौशल्यपूर्ण असतात व पुढील शिक्षणामध्ये जिल्हा परिषदेचा विद्यार्थीच विविध स्पर्धा परीक्षांमध्ये टिकतो असे प्रतिपादन पत्रकार लक्ष्मण घुगे यांनी केले. यावेळी, माजी सरपंच सुभाष वाघ,समाधान चव्हाण, वाघ ,शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राहुल कासार ,शिवाजी विंचू, पत्रकार अनिल अलगट, सोमनाथ राखे ,दयानंद जाधव, सोमनाथ भाबड, संतोष भाबड ,भाऊलाल वाघ ,सुभाष जाधव ,भाऊराव जाधव ,राजेंद्र वाघ, बाळू वाघ ,बापू वाघ ,गोकुळ विंचू ,भास्कर वाघ, राजेंद्र वाघ, त्याचबरोबर शाळेचे मुख्याध्यापक रामू घुगे , संतोष गिरे, , सिंधू विंचू , अपर्णा वर्पे, भोसले मॅडम आधी उपस्थित होते प्रस्ताविक शिक्षण विस्तार अधिकारी ठोके मॅडम यांनी केलं तर सूत्रसंचालन रामकृष्ण घुगे सर यांनी केले तर आभार प्रदर्शन संतोष गिरे यांनी केले. राजापूर केंद्रातील सर्व शाळांमध्ये नवगताचे स्वागत करण्यात आले.

## साकोरे विद्यालयात पुस्तके वाटप




**दै. आवाज वृत्तसेवा...**

पेङकाई माता सामाजिक शैक्षणिक संस्थेच्या - माध्यमिक विद्यालय साकोरे ता नांदगाव जि नासिक विद्यालयात इयत्ता ५ वी नवीन विद्यार्थी स्वागत् करण्यात आले यावेळी प्रार्थना, परीपाठ , कुलस्वामिनी पेङकाई माता , सरस्वती पूजन मुख्याध्यापक योगेश पाटील यांनी केले त्यानंतर इयत्ता ५ वी विद्यार्थी यांना पुस्तके , वही , पेन वाटप करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष दिनेश पाटील सर यांनी गरीब व होतकरु इयत्ता ९ वी , १० वी विद्यार्थ्यांना पुस्तके संच भेट म्हणून दिलेत त्याबद्दल त्यांचे आभार विद्यालयाकडून माणण्यात आले. श्रीमती पूनम बोरसे व श्री सुदर्शन सुरसे, संजय बोरसे यांनी इयत्ता ५ वी नवीन विद्यार्थी यांचे अनोख्या पध्दतीने स्वागत् केले यावेळी बोरसे व्ही पी, बोरसे ए आर , बोरसे आर बी , क्षीरसागर के एस , बोरसे आर एच , भारत बोरसे , रवी बीरसे शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष , सचिव पालक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लासलगावच्या जैन शाळेत प्रवेशोत्सव

**दै. आवाज वृत्तसेवा...**

शरद लोहकरे, लासलगाव - जैन प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांच्या पावलांचे ठसे उमटवून प्रवेशोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी बालवाडी इयत्ता १ लीच्या विद्यार्थ्यांचे पहिले पाऊल उपक्रमांतर्गत पावलाचे ठसे घेण्यात आले. त्यांचे औक्षण करून फूल देऊन स्वागत करण्यात आले. सेल्फी पॉईंट ची छान सजावट करून त्यात विद्यार्थ्यांचे सेल्फी घेण्यात आले. प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. शाळेची सजावट केली होती.

## शाळेच्या पहिल्या दिवशी शाळेत मिकी माऊस; विद्यार्थ्यांवर फुलांचा वर्षाव आणि केक वाटप करून केले स्वागत




**दै. आवाज वृत्तसेवा...**

तुषार रौंदळ, सटाणा: येथील दोधेश्वर पब्लिक स्कूलचे सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाचे स्वागत मोठ्या उत्साहात करण्यात आले. शाळेच्या गेट पासून परिसरात सर्वत्र रांगोळी काढण्यात आली होती. जागोजागी फुलांची, फुग्यांचा आणि फलक लेखन तसेच फुग्यांच्या कमानी उभ्या करून शाळा या विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी तयार होती. सुरुवातीला शाळेच्या मुख्याध्यापिका श्रुती शेट्टी आणि इयत्ता पहिलीला दाखल झालेल्या विद्यार्थ्यांच्या हस्ते फित कापून शाळेत प्रवेश देण्यात आला. त्यानंतर स्वतः मुख्याध्यापिका श्रुती शेट्टी, शिक्षिका सर्व शिक्षक, शिक्षिका यांनी विद्यार्थ्यांवर पुष्पवृष्टी करून प्रत्येक वर्गशिक्षिकेने प्रत्येक विद्यार्थ्याचे औक्षण केले. शाळेत विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी मिकिमाऊस हजर झाला. प्रत्येक विद्यार्थ्यांशी हस्तांदोलन करून मिकी माऊस याने सर्वांना परिपठासाठी प्रांगणात आणले.

यानंतर संस्थेच्या सचिव श्रीमती मनोहरम्मा सुलू, मुख्याध्यापिका श्रुती शेट्टी आणि विद्यार्थ्यांच्या हस्ते सरस्वती पूजा करून प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच शालेय परिपाठ घेण्यात आला. त्यानंतर मनोरंजनाचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी मिकी माऊस याने प्रत्येक वर्गाच्या विद्यार्थ्यांसोबत नृत्य करत स्वागत केले. मुले मिकी माऊसला सोबत अत्यंत आनंदाने गाण्यांच्या तालावर ठेका धरत होते. विद्यार्थ्यांना शाळेच्या वतीने प्रत्येक विद्यार्थ्याला केक वाटप करण्यात आला. विविध प्रकारच्या खेळणी, शैक्षणिक साहित्य, वर्ग सजावट पाहून विद्यार्थी अत्यंत आनंदीत होते.

यावेळी शाळेचे कार्यालयीन प्रमुख दादा खरे, शिक्षक राहुल येशी, दीपक पाटील, विनय वालिया, मोईन शेख, शिक्षिका माधुरी देवरे, मनिषा सोनवणे, वर्षा जगताप, प्रतिभा खैरनार, अमृता जाधव, अंजली विसपुते, रूपाली जाधव, वृषाली खैरनार, पूजा जाधव, वर्षा सोनवणे यांसह शिक्षकेतर कर्मचारी यांनी नवागत विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी वेगवेगळी जबाबदारी पार पाडली. आज पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांची संख्या लक्षणीय होती हे शिक्षकांच्या जनजागृतीने आणि पालकांच्या जागरूकतेमुळे झाले.

## पिंपळगाव लेप प्राथमिक शाळेत नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत



**दै. आवाज वृत्तसेवा...**

दिपक ढोकळे, पिंपळगाव लेप : प्रतिनिधी येथील प्राथमिक शाळेतील नवागत विद्यार्थ्यांचे औक्षण करून स्वागत करण्यात आले. शैक्षणिक वर्षाचा शाळाचा पहिला दिवस नवागतांच्या स्वागताने आणि विविध शैक्षणिक उपक्रमाने सोमवार दि.१६ जून रोजी पार पडला.यावेळी लहानग्या मुलांच्या चेहर्यावर आनंद ओसंडून वाहत होता. येथील प्राथमिक शाळेतील नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत शाळेच्या प्रवेशद्वारापासून बैलगाडीला फुग्यांची सजावट करत गावातून मिरवणूक काढण्यात आली. शाळेत पहिलीच्या नवागत विद्यार्थ्यांचे पुष्प देऊन औक्षण करण्यात आले होते. तसेच शाळेतील नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत सरपंच सौ.सुलोचना दौंडे,सदस्य विनोद अहिरे,रामनाथ दौंडे,तंटामुक्त समितीचे अध्यक्ष माणिक रसाळ,यांच्या हस्ते लालसर रंगात पाऊल बुडवून ठसा पेपरवर उमटविण्यात आला होता. तर शाळेतील विद्यार्थ्यांना पहिल्याच दिवशी गणवेश वाटप तसेच पुस्तके वाटप करण्यात आले आहे.यावेळी शाळेतील लहानग्या बालकांसह मुला-मुलींना शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष किरणभाऊ गागरे यांच्याकडून पोषण आहारात गोड जिलेबी पदार्थ तसेच खिचडी भाताचे जेवण देण्यात आले होते.शेवटी ग्रामस्थांच्यावतीने पाठ्य पुस्तकांचे आणि गणवेशाचे वाटप करण्यात आल्याने विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते.पूर्वी मुलांना शाळेत दाखल करताना मुलांची मोठ्या प्रमाणात रडारड असायची परंतु सध्या अनोख्या पद्धतीने शाळांमध्ये प्रवेश होत.

असल्याने नवागत मुलांच्या चेहर्यावर अतिशय आनंदमय वातावरण ओसंडून वाहतांना दिसुन येत आहे.असेच वातावरण वर्षभर राहील याची ग्वाही मुख्याध्यापक जालिंदर सोनवणे दिली.याप्रसंगी सरपंच सौ.सुलोचना दौंडे,रामनाथ दौंडे, विनोद अहिरे,माणिक रसाळ,साहेबराव दौंडे,दिगंबर दौंडे,किरण गागरे,शंकर काळे,रेवणनाथ गोधडे, चांगदेव दौंडे,निलेश दुनबळे,कारभारी गायकवाड, अभिमन्यू वाघ,दिनकर दुनबळे,ग्रामविकास अधिकारी बाळासाहेब नवले,रोहिणी गायकवाड निलमा दुनबळे तसेच मुख्याध्यापक जालिंदर सोनवणे शिक्षक संतोष गायकवाड,दगुजी सोनवणे,योगेश देशमुख,अनिल दौंडे,नहिम मनियार,भरत यादव,बाबासाहेब गोरे,तसेच शिक्षिका कल्पना बोचरे,शितल सानप,योगिता पोटे, वैष्णवी दौंडे,आदींसह गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.

## सरस्वती विद्यामंदिर शाळेच्या पहिल्या दिवशी विविध उपक्रमांनी शाळा प्रवेशोत्सव साजरा



**दै. आवाज वृत्तसेवा...**

शरद लोहकरे, लासलगाव - सरस्वती विद्यामंदिर शाळेमध्ये बालचिमुरड्यांचं शाळेच्या पहिल्या दिवशी विविध उपक्रम राबवत स्वागत करण्यात आले . कार्यक्रमाच्या सुरुवातीला संस्थेचे संचालक बाळासाहेब बोरसे, सुनील शिंदे, मुख्याध्यापक भीमराव शिंदे व नवीन विद्यार्थ्यांच्या शुभहस्ते सरस्वती पूजन करून शैक्षणिक वर्षाची सुरुवात करण्यात आली . यानंतर नवीन दाखल विद्यार्थ्यांसाठी सेल्फी पॉईंट तयार करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या पायाचे व हाताचे ठसे उमटत गुलापुष्प देत संगीतमय वातावरणात विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. उपस्थित पालक व शिक्षक यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पुस्तकांचे वितरण करण्यात आले. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांची परिसरातून प्रभात फेरीचे आयोजन करून जेवणाची मेजवानी देण्यात आली. या स्वागत समारंभाचे संस्थेचे अध्यक्ष जगदीश होळकर ,उपाध्यक्ष सुलेमान मुलांनी, सचिव गुणवंत होळकर, संचालक बाळासाहेब बोरसे, सुनील शिंदे,डॉ. विकास चांदर ,संदीप होळकर तसेच शाळेचे मुख्याध्यापक भीमराव शिंदे ,राजेंद्र महाले व परिसरातील पालक यांच्याकडून कौतुक करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रदीप ठाकरे यांनी केली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुनील आव्हाड,कैलास पातळे, संदीप सूर्यवंशी, नवनाथ जिरे, कांचन शेलार, धर्मेंद्र निकम ,रुपाली शिंदे, मोहन नाईक, सोनाली होळकर ,स्वप्नील आहिरे, सुनील होळकर, दिपाली शेळके ,हर्षाली रसाळ ,वर्षा गुंजाळ, तुषार फेंगडे आदी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी प्रयत्न केले.

## मांडवड विद्यालयात शालेय प्रवेशोत्सव उत्साहात साजरा




**दै. आवाज वृत्तसेवा...**

सिताराम पिंगळे, मांडवड (प्रतिनिधी) - मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक संचलित स्व. शरद आण्णा आहेर जनता विद्यालय, मांडवड विद्यालयांमध्ये शालेय प्रवेशोत्सव सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला.आज दिनांक (१६) रोजी शैक्षणिक वर्ष २०२५२६ चा पहिला दिवस विद्यालयांमध्ये प्रवेशोत्सव सोहळा साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मांडवड गावचे तंटामुक्ती अध्यक्ष चंद्रसेन आबा आहेर हे होते. यावेळी विद्यार्थ्यांना नवीन पाठ्यपुस्तक तसेच गुलाबपुष्प व शालेय पोषण आहार योजने अंतर्गत मिष्टांत भोजन देण्यात आले. सदर कार्यक्रमाप्रसंगी शालेय स्कूल कमिटी चे अध्यक्ष प्रशांत भाऊ आहेर, शिक्षणतज्ञ अजित आहेर, गावातील प्रतिष्ठित नागरिक जिल्हा परिषद सेवानिवृत्त मुख्याध्यापक बाळासाहेब मोहिते, उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाप्रसंगी विद्यालयाचे नवनियुक्त मुख्याध्यापक थेटे एस. जी. यांचाही विद्यालया तर्फे स्वागत करण्यात आले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन विद्यालयाचे उपशिक्षक हेमंत परदेशी यांनी केले. तर आभार प्रदर्शन विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक कवडे एस. एस.यांनी केले.